## अतिरीक्त मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय क्र.४, अहमदनगर यांचे न्यायालयात.

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. १७३५/२०२५ नि.क्र.**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | गुन्हा घडल्याचा दिनांक | :- | २४/०१/२०२५ |
| २- | प्रकरण दाखल केल्याचा दिनांक | :- | ११/०२/२०२५ |
| ३. | फिर्यादीचे नाव | :- | महेश्वर मल्टीस्टेट को. ऑप क्रेडीट सोसायटी लि., काष्टी, ता. श्रीगोंदा, जिल्हा - अहमदनगर, शाखा भिस्तबाग, सावेडी, अहमदनगर. तर्फे व करीता अधिकृत प्रतिनिधी श्री. चैतन्य देविदास भुसारे,वय - ३० वर्षे, धंदा - नोकरी, रा. अहमदनगर. |
| ४. | आरोपीचे नाव | :- | निलेश अशोक जगताप, वय - ३९ वर्षे, धंदा - व्यवसाय, रा. हनुमान मंदिराजवळ, पाण्याच्याटाकी शेजारी, वाळकी रोड, अरणगांव, अहमदनगर. |
| ५. | गुन्हा कलम | :- | पराक्राम्य दस्त अधिनियम कलम १३८ अन्वये |
| ६. | गुन्हयाचा तपशील | :- | |

ज्याअर्थी तुम्ही फिर्यादीकडून घेतलेल्या कायदेशीर देय रक्कमेच्या परतफेडीसाठी त्यांना दिनांक १८/१२/२०२४ रोजी, रक्कम रूपये २,००,०००/- चा धनादेश क्र. ००००08 दिला होता. तुम्ही दिलेला धनादेश फिर्यादीने त्यांच्या बँक खात्यात वटविण्यासाठी टाकला असता तुमच्या **खात्यात पुरेशी रक्कम** नसल्यामुळे तो दिनांक २०/१२/२०२४ रोजी बँकेच्या मेमोसह अनादरीत होऊन परत आला. त्याबाबत फिर्यादीने तुम्हाला दिनांक ३०/१२/२०२४ रोजी नोटीस पाठविली असता सदर नोटीस तुम्हाला प्राप्त झाली. परंतु तुम्ही विहीत मुदतीत वादातील धनादेशाची रक्कम परत न केल्यामुळे तुम्ही परक्राम्य दस्त अधिनियम, कलम १३८ प्रमाणे शिक्षापात्र अपराध केला आहे व वर नमुद शिक्षापात्र अपराधाकरिता तुमचे विरूध्द संपरिक्षा चालविण्यात येत आहे.

७.आरोपीचे प्रतिकथन :–

| | |
|---|---|
| प्रश्न क्र. :१ | तुम्हाला फिर्यादीने सादर केलेल्या नकला मिळाल्या काय ? |
| उत्तर | होय. |
| प्रश्न क्र. :२ | तुम्हाला आता जो कलम १३८ पराक्राम्य दस्त अधिनियम अन्वये गुन्हयाचा तपशील वाचून दाखविला तो तुम्हाला समजला काय ? |
| उत्तर | होय. |
| प्रश्न क्र. :३ | धनादेश तुमच्या खात्याचा असल्याचे तुम्हाला मान्य आहे काय ? |
| उत्तर | नाही. |
| प्रश्न क्र. :४ | धनादेशावर तुमची सही असल्याचे तुम्हाला मान्य आहे काय ? |
| उत्तर | नाही. |
| प्रश्न क्र. :५ | तुम्ही हा धनादेश फिर्यादीला दिला होता का ? |
| उत्तर | नाही. |
| प्रश्न क्र. :६ | धनादेश पारित करताना त्यातील रक्कम फिर्यादीला देय असल्याचे तुम्हाला मान्य आहे काय |
| उत्तर | नाही. |
| प्रश्न क्र. :७ | तुम्ही गुन्हा केल्याचे तुम्हाला मान्य आहे काय ? |
| उत्तर | नाही. |
| प्रश्न क्र. :८ | जर तुमचे दायित्व तुम्ही नाकारत असाल तर तुमचा बचाव काय आहे?<br>अ) केवळ सुरक्षेसाठी दिलेला धनादेश, ब) कर्जाची पूर्ण परतफेड केली आहे.<br>क) धनादेशाचा गैरवापर केला आहे किंवा त्यात बदल केला आहे.<br>✔ ड) इतर बचाव स्पष्टपणे लिहा |
| उत्तर | मुळ कर्जदाराला मी माझा धनादेश दिला होता. त्याने फिर्यादी संस्थेला तो धनादेश दिला. |
| प्रश्न क्र. :९ | खटल्याच्या या टप्प्यावर तुम्ही तडजोड करण्यास तयार आहात काय ? |
| उत्तर | नाही. |

आरोपीची सही / अंगठा

<u>वर नमुद केल्याप्रमाणे आरोपीला त्याला समजेल अशा भाषेत गुन्हयाचा तपशील वाचुन व समजावुन सांगण्यात आला.</u>

MADHURI RAMNARAYANSINHA KHANWE

Digitally signed by MADHURI RAMNARAYANSINHA KHANWE
Date: 2025.12.23 16:32:55 +0530

( माधुरी रा. खनवे )

दिनांक २३/१२/२०२५

अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
कोर्ट नं.०४, अहमदनगर